# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०७ जून २०१६

## पदवीच्या प्रथमवर्षाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना नविन अभ्यासक्रम

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये सुधारीत सीबीजीएस पध्दतीचा वापर

मुंबई – शैक्षणिक वर्ष २०१६- १७ ला पदवीच्या प्रथमवर्षाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्याला नविन अभ्यासक्रम लागू होणार असून विद्यापीठ प्रशासनातर्फे पदवीच्या प्रथम वर्षाला प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना नविन अभ्यासक्रम देण्यासाठी विद्यापीठ कटीबध्द आहे. यासाठी विद्यापीठाचे विविध अभ्यासमंडळे शर्तीचे प्रयत्न करीत आहेत. शैक्षणिक वर्ष २०१६ -१७ पासून मुंबई विद्यापीठाने सुधारीत सीबीजीएस पध्दतीचा अवलंब करीत सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल घडवून आणत आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाने सर्व शाखांचे अभ्यासक्रम बदलण्याचे ठरविले असून ते लवकरच पूर्णत्वास येणार असल्याचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी आज सांगितले.मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात आयोजित केलेल्या प्राचार्य आणि विभाग प्रमुखांच्या बैठकीला त्यांनी संबोधित केले. पुढे ते म्हणाले की, गेल्या ११ महिन्यात विद्यापीठाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले असून विद्यार्थ्यांना केंद्रबिंदु ठेऊन अनेक अभिनव प्रयोग हाती घेतले आहेत.पारंपरीक अभ्यासक्रमाबरोबच कौशल्याधारीत आणि रोजगाराभिमूख अभ्यासक्रम राबवितांना विद्यार्थ्यांना अधिकाअधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी विद्यापीठाकडून पहिल्यांदाच शेवटच्या सत्रात लाईव्ह प्रोजेक्ट ही संकल्पना राबविली जात आहे. शेवटच्या सत्रात विद्यार्थ्यांना हॅंड्स ऑन ट्रेनिंग किंवा इंटर्नशिपच्या माध्यमातून प्रशिक्षण दिले जाणार असून त्यासाठी क्रेडिट दिले जाणार आहेत.

विद्यापीठाने परीक्षा पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणताना पदवीच्या प्रथम आणि द्वीतीय वर्षाच्या सत्राच्या प्रश्नपत्रिका आता विद्यापीठाकडून तयार केल्या जाणार असून या परीक्षांसाठी सर्व संलग्नित महाविद्यालयांसाठी सर्वसमावेशक वेळापत्रक तयार केले जाणार आहे. त्याचबरोबर पारंपरिक अभ्यासक्रमासाठी म्हणजेच बीए,बीकॉम आणि बीएस्सीसाठी अंतर्गत गुणांची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र सेल्फ फायनान्स अभ्यासक्रमांसाठी अंतर्गत परीक्षा तशीच सुरु राहणार आहे. तसेच परीक्षा आटोपल्यावर उत्तरपत्रिका संबंधित महाविद्यालयातून गोळा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचेही विद्यापीठाने ठरविले आहे.

बैठकीला उपस्थित असलेल्या सलंग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आणि विभागप्रमुखांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ.संजय देशमुख यांनी महाविद्यालयांमध्ये सक्षम समित्याही तयार करण्यावर विशेष भर दिला. प्रत्येक महाविद्यालयांध्ये तक्रार समिती, अँटी रॅगिंग कमिटी, सेक्शुअल हॅरशमेंट एक्ट इत्यादी सक्षम समित्या कार्यरत करण्यासाठी आवाहन केले. त्याचबरोबर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा

आयोगाच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयांनी शैक्षणिक परीक्षण आणि नॅक मुल्यांकन करुन घेण्यावरही विशेष भर दिला.

मुंबई विद्यापीठाने पदवीच्या प्रथम वर्षासाठी प्री-एडमिशन ऑनलाईन प्रक्रीयेसंबंधी परिपत्रक जाहीर केले असून ही प्रवेश प्रक्रिया सुरळीत राबवित असताना विद्यार्थ्यांच्या पात्रता निकषांची पूर्तता करण्यावरही त्यांनी भर दिला. त्याचबरोबर निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी आणि मतांची टक्केवारी वाढविण्यासाठी केलेल्या आव्हानासाठी महाविद्यालय आणि विभागाने अधिकाअधिक समाजप्रबोधनात्मक कार्य पार पाडावे असेही त्यांनी उपस्थित सर्व प्राचार्य आणि विभागप्रमुखांना सांगितले.

आजच्या या बैठकीला मुंबई विद्यापीठाचे बीसीयुडी संचालक,डॉ.अनिल पाटील, कुलसचिव डॉ.एम.ए.खान, विद्याशाखांचे समन्वयकांसह विभागप्रमुख आणि अनेक महाविद्यालयातील प्राचार्य उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)